# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन

(महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१, अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत)

८३, मित्तल चेंबर्स, आठवा मजला, २२८, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी :+९१ - २२ - २२८२ ८२६२ / २२०२ ८२६१

ई-मेल : mahacim.mumbai@gmail.com संकेत स्थळ : www.mcimindia.co.in


जा.क्र. एमसीआयएम/२५०८१९६/२०२५ दि. २२.०८.२०२५

## सूचना

महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, मुंबई या परिषदेच्या सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीं (आयुर्वेद व युनानी) यांस सूचीत करण्यात येते की, महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ च्या कलम २३ अ उपकलम (१) खंड (अ) आणि (ब) नुसार विहित कालावधीत नोंदणी नूतनीकरण न केलेल्या नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायींची यादी (List of Removed Practitioners) दि. ०१.०८.२०२५ रोजी (नोंदणी क्र. I-1 ते नोंदणी क्र. I-93027 पर्यंत) तयार करण्यात आली आहे.

२. उक्त नमूद यादीमध्ये नाव असलेल्या वैद्यकीय व्यवसायीं आपल्या नोंदणीचे नूतनीकरण परिषदेच्या संकेतस्थळावर https://mcimindia.co.in/Account/type7 (Renewal/Restoration) ॲप्लीकेशनद्वारा ऑनलाईन पद्धतीने अर्ज व विहित शुल्क परिषदेस सादर करुन करु शकतात. त्यासाठीचा कालावधी हा ९० दिवसांचा असेल. तसेच ज्या वैद्यकीय व्यवसायींनी नोंदणीचे नूतनीकरण केले आहे व तसे Renewal Letter प्राप्त झाले असेल, परंतू सदरील यादीमध्ये नाव असेल अशा वैद्यकीय व्यवसायींनी परिषदेशी तात्काळ संपर्क साधावा. जेणेकरुन त्यांचे नाव राज्य नोंदवहीत अद्यावत केले जाईल.

३. तसेच सदरील यादीमधील (List of Removed Practitioners) ज्या वैद्यकीय व्यवसायींचा मृत्यू झाला असेल अशा वैद्यकीय व्यवसायींचे मूळ नोंदणी प्रमाणपत्र व मृत्यूप्रमाणपत्र (दाखला) त्यांच्या नातेवाईकांनी वा कुटुंबातील सदस्यांनी परिषदेस लवकरात लवकर सादर करावे. जेणेकरुन त्यांची नोंदणी राज्य नोंदवहीतून रद्द करता येईल.

आपला

(डॉ. डी. यु. वांगे)
प्रबंधक

सोबत: List of Removed Practitioners यादी परिषदेच्या या संकेतस्थळावर https://mcimindia.co.in/RemovedList.aspx उपलब्ध आहे